प-१

| | | |
|---|---|---|
| ISO9001:2015 | **ग्रामपंचायत विभाग,जिल्हा परिषद सिंधुदुर्ग**<br>ईमेल:-dyceovpzp@gmail.com दुरध्वनी क्रमांक:-०२३६२-२२८७९६<br>जिल्हा परिषद प्रशासकिय इमारत,दुसरा मजला, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग,सिंधुदुर्गनगरी-ओरोस,ता.कुडाळ,जि.सिंधुदुर्ग,पिन-४१६८१२ | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

जा.क्र.सिंजिप/ग्रा.पं.कार्या-०६अ/ब/फेरफार परिपत्रक/1656 /२०२३ दि. /०७/२०२३ 02/08/2023

**विषय-ग्रामपंचायत नमुना नंबर आठ मध्ये इमारती किंवा जागेच्या नोंदी फेरफार करताना दुरुस्ती करताना अनुसरावयाची कार्यपद्धती विशद करणे.**

वाचा:-

१.महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १२४,

२. महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी ( शुल्क ) नियम, १९६०,

३. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एसटीपी-२१८९/ प्र.क्र .६७३/भाग 2 म-१/,दिनांक ०२ डिसेंबर ,१९८१,

४. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्रमांक नोंदणी १०९३/२४८४/प्र .क्र.८२१,१-म/दिनांक २७ मार्च १९९५

५. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम ,१९६६.

**प्रस्तावना:**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १२४ व महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम, १९६० व त्या अनुषंगाने इतर नियम व अटीच्या तरतुदी नुसार,ग्रामपंचायत हद्दीतील इमारती, मोकळया / खुल्या / पडसर जागा व जमिनीवर कर आकारणी करण्यात येते. सदर आकारणीच्या अनुषंगाने करपात्र इमारतीच्या नोंदी ग्रामपंचायतीकडील घरपत्रक म्हणजेच नमुना नंबर 8 मध्ये आकारणी यादी मध्ये करण्यात येत आहे. घरपत्रक /नमुना नंबर 8 म्हणजे इमारती व मोकळया जागेचे आकारणी यादी (असेसमेंट लिस्ट) आहे. व कोणत्या व्यक्तीकडून अशी कर व फी वसुल करावी याची यादी आहे. सदरचाअभिलेख हा मालकी हक्क दर्शविणारा अभिलेख नसुन करास पात्र असणाऱ्या इमारती व मोकळया जागा याची यादी आहे. ग्रामपंचायती अंतर्गत इमारती नोंदीमध्ये फेरफार, फेर बदल दुरूस्ती करताना नियमाप्रमाणे कायदेशीर यथोचित कार्यपध्दती अवलंबिली जात नाही.एखादया व्यक्तीने, संस्थेने अथवा अन्य कोणीही नोंदीसाठी / नोंदीतील फेरफारासाठी ग्राम पंचायती कडेअर्ज केल्या नंतर किमान आवश्यक त्या कागदपत्राची उदा. 7/12 उतारा, 8अ उतारा, प्रॉपर्टीकार्डाचा उतारा व नकाशा, नोंदणीकृत खरेदीपत्र, इंडेक्स उतारा, दानपत्र, नोंदणीकृत समंतीपत्र, नोंदणीकृत हक्कसोड पत्र, लिज / मॉरगेजपत्र, लायसेन्स करारनामा, शासनाकडून जागावाटप केलेचा आदेश, कब्जेपट्टी, जागेचा अधिकृत नकाशा,वारसा पत्रक इ. कागदपत्राची अथवा इतर आवश्यक कायदेशीर कागदपत्राची सकृत दर्शनी शहानिशा / खात्री करण्यात येत नाही. तसेच या बाबतीत सदर दस्त ऐवजाच्या मुळ प्रतीची पडताळणी केली जात नाही. घाई गडबडीने अत्यंत चुकिच्या पध्दतीने बेकायदेशीर नोंदीची प्रक्रिया करणेत येते, किंवा कोणतेही ठोस कारण अथवा कायदेशीर कारण न देता नोंद करण्यास टाळाटाळ करण्यात येते. ग्रामपंचायतीच्या परस्पर / मंजूरी न घेता / योग्य ते ग्रामपंचायत ठराव विहीत मार्गाने पारीत न करताच मिळकत मालकाचे नांव बदलने, मुळ मालकी असलेल्या मालकाची पूर्व परवानगी न घेता नोंदी मध्ये बदल करणे, शासनाच्या मालकीच्या मोकळया / खुल्या / पडसर जागा अनाधिकृतपणे नोंदी करणे, नोंदी / फेरफार करताना विहीत कालावधीची जाहिर नोटीस प्रसिध्द न करणे अथवा काही वेळेस घेणेत आलेल्या संबंधिताच्या हरकतीचा विचार न करतानोंदी करणे इत्यादी प्रकार ही निदर्शनास आलेले आहेत.

सदर बाबत तक्रार निर्माण झाल्यावर या मध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती, व जिल्हा परिषद स्तरावरील प्रशासनाचा वेळ वाया जातो. काही प्रकरणे तक्रारदार आंदोलने, आमरण उपोषण, आत्मदहन व अन्य मार्गाचा वापर करून जिल्हा प्रशासनाकडे दाद मागत असतो. केवळ ग्रामपंचायत स्तरावर सदर नोंदीची कायदेशीर प्रक्रिया न राबविल्याने या सर्व बाबी घडत असलेचे निदर्शनास येत आहे. आकारणी यादी मधील मालकी हक्का मध्ये सुधारणा करणेसाठी करावयाच्या कार्यवाही बद्दल महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम, १९६० भाग -२ इमारती व जमिनी यावरील कर यातील पोट नियम १६ अ, अन्वये मिळकतीचे मालकीचे हस्तांतराणाची नोटीस पंचायतीला देणे आणि आकारणी यादीत सुधारणा करणे, तसेच महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग कडील शासन निर्णय क्रमांक एसटीपी-2189-प्र.क्र.673/भाग-2/म-1, मंत्रालय मुंबई 400032, दिनांक 2 डिसेंबर,1989 अन्वये नोंदणी न केलेले दस्त ऐवज हस्तांतरणाचा ग्राहय पुरावा होवू शकत नाही असे नमुद आहे. त्यास अनुसरून वरील बाबी टाळण्यासाठी, विविध स्तरावरील तक्रारीचे प्रमाण कमी करणेसाठी आणि सर्वच ग्रामपंचायतीमध्ये सुसंगतपणा व एकसुत्रता राहणेसाठी ग्रामपंचायतीने नवीन इमारतींच्या नोंदी करताना / मुळ नोंदी मध्ये फेर बदल/फेरफार करताना अंमलात

आणावयाच्या कार्यपध्दती बाबत या परिपत्रकाद्वारे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**परिपत्रक-**

सर्वसाधारणपणे इमारतीचा मालकी हक्काचा फेर फार खालील परिस्थितीत करण्यात येतो.

अ.)मूळ इमारतीचा मालक मयत झाल्यास वारसा हक्काने फेर फार करणे.

ब.) इमारत विक्री केल्यास / इमारतीचा मालकाचे नोंदणीकृत हस्तांतरण / खरेदीखत / बक्षिसपत्र/ दानपत्र असल्यास फेर फार करणे.

क) मा. न्यायालयाने एखादया मालमत्तेबाबत आदेश दिल्यास फेर फार करणे.

**ग्रामपंचायतीने इमारतीच्या मालकी हक्का संदर्भात फेर फार करताना सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे प्रक्रीया अवलंबविण्यात यावी.**

१.इमारतीच्या कोणत्याही प्रकारचा फेरफार/फेरबदल करणेसाठी संबंधित व्यक्तीकडून अथवा संस्थेकडून लेखी अर्ज प्राप्त झाले नंतर ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी यांनी अर्जदार यांना अर्जाची लेखी दिनांकित पोहोच दयावी. अर्जाची नोंद आवक नोंद वहीत करावी.

2.अर्ज प्राप्त झाल्या नंतर अर्जासोबत जोडलेल्या कादपत्रांची छाननी / शहानिशा करावी आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडलेली असतील तरच सदरचा अर्ज लगतच्या मासिक सभेपुढे ठेवणेत यावा. अन्यथा सदरचा अर्ज नियमानुसार कारणे देवून अर्जदारास परत करणेत यावा.

३.भारतीय नोंदणी अधिनियम 1908 च्या कलम 17 अन्वये स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण विक्रीद्वारे, गहाणखताद्वारे,बक्षीस पत्राद्वारे, वाटणी पत्राद्वारे, भाडे पट्टयाद्वारे, हक्कसोड पत्राद्वारे, न्यायालयाच्या डीक्रीद्वारे, किंवा अन्य कोणत्याही प्रकारे केल्यास सदर व्यवहारात फेर फाराने नोंदणी करणे आवश्यक आहे.

४.प्रकरण न्यायप्रविष्ठ नसल्याची खातरजमा करावी. (तसेच साध्या कागदावर हमीपत्र अर्जदार यांचेकडून घेणेत यावे.

५.काही मिळकतीच्या किंवा वादग्रस्त मिळकतीच्या मालकी / वारसा विषयी खात्री पटत नसल्यास अर्जदाराच्या खर्चाने वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रकटन दयावे.

६.मुळ मिळकत धारक मयत झालेस त्याच्या मिळकतीची वारस नोंद करताना स्थानिक पातळीवर चौकशी करून त्यांचे अपत्य/ अपत्ये, पती, पत्नी, थेट वारस ठरत असल्यास तशा प्रकारे सर्व संबंधित थेट वारसांचे एकत्रित प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. आवश्यकता वाटल्यास हक्कसोडपत्र घ्यावे व रितसर कायदेशीर कार्यपध्दतीचा अवलंब करून मासिक सभेच्या मान्यतेने नोंदीची कार्यवाही करणेची आहे. ज्या ठिकाणी मिळकत धारकास सरळ वारदार नसतील (अपत्यअथवा पती / पत्नी ) तर अशा बाबतीत तहसिलदार यांचे वारसाचे प्रमाणपत्र संबंधिताकडून प्राप्त करून घ्यावे. तहसिलदार संबंधितास वारसाचे प्रमाणपत्र देणेस सक्षम नसतील अशा प्रकरणी मे. न्यायालयाचे वारसाचे प्रमाणपत्र घेण्यात यावे. मात्र सर्वच प्रकरणामध्ये तहसिलदार अथवा मे.न्यायालयाच्या वारसाच्या प्रमाणपत्राचा आग्रह धरू नये.वारसाच्या प्रमाणपत्रा बाबत एकापेक्षा जास्त वारस आहेत अशा बाबतीत ज्यांच्या नावे नोंद करावयाचे आहे.त्या व्यक्तीरिक्त इतरांचे नोंदणीकृत हक्क सोडपत्र घ्यावे.

७.त्यानुसार अर्जदार यांचेकडून कागदपत्राची पूर्तता प्राप्त झाल्या नंतर महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम १९६० चे नियम ११ ते १६ अ प्रमाणे सदर कागदपत्राची छाननी / शहानिशा करून आणि प्राप्त रास्त हरकती विचारात घेवून हरकती बाबत चौकशी व पडताळणी करून नोंदीसाठी / फेरफारासाठी वैध असलेला लगतच्या ग्रामपंचायत मासिक सभेपूढे ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांनी अर्ज कार्यवाहीसाठी ठेवला पाहिजे.

८.सचिवाने सादर केलेल्या अर्जा व्यतिरिक्त अथवा अपूर्ण, नियमबाहय, बेकायदेशीर असलेल्या मिळकतीच्या नोंदी विषयी मासिक सभेत सरपंच / उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी आग्रह धरल्यास, आग्रह धरणाऱ्या पदाधिकाऱ्याचे / सदस्याचे नांव / नांवे इतिवृत्तांतमध्ये नोंद करणेत यावी. नोंद का करता येत नाही या बाबत ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी यांनी स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रतिकूल मत व्यक्त करून देखील, सदर ठराव ग्रामपंचायत मासिक सभेने पारीत केल्यास, ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकाऱ्याने सदर ठरावाची प्रत सभा झाले नंतर सात दिवसाचे आत गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचेकडे अर्जाद्वारे सादर केली पाहिजे व सदर अर्जाची दिनांकित पोहोच घेणेची आहे.

९.ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी यांचेकडून सदर ठरावाची प्रत प्राप्त झाल्या नंतर गट विकास अधिकारी यांनी संबंधित विस्तार अधिकारी (पंचायत) यांचे मार्फत ठरावाची कायदेशीर पडताळणी करून ग्रामपंचायतीस सात दिवसाच्या आत लेखी मार्गदर्शन कळविले पाहिजे.

१०.गट विकास अधिकारी यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार ग्रामपंचायतीने नजिकच्या मासिक सभेत चर्चा करावी.गट विकास अधिकारी यांनी ठरावास अनुकूल मार्गदर्शन केले असल्यासच नोंदी बाबतचा ठरावा पारीत करता येईल आणि नोंदीच्या अनुषंगाने काही पूर्तता सुचविली असल्यास

कागदपत्राची पुर्तता केल्या नंतर त्या नंतरच्या मासिक सभेत विषय ठेवावा. गट विकास अधिकारी यांनी नोंद करता येणार नाही असे प्रतिकुल मार्गदर्शन केले असल्यास सदरचा नोंदी बाबतचा अर्ज कार्यवाही न करता निकाली काढण्यात यावा.

११.गट विकास अधिकारी यांनी नोंद करता येणार नाही अथवा ठराव घेता येणार नाही असे मार्गदर्शन करून देखील काही सरपंच / उपसरपंच व सदस्य यांनी नोंद करण्या बाबत आग्रह धरल्यास अशा सर्व संबंधित तसेच सुचक व अनुमोदक यांच्या नावासह स्वाक्षऱ्या घ्याव्यात व संबंधित ग्रामपंचायत सदस्य / कार्यकारीणी यांचेवर मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील कलम 14, कलम 39, कलम 145 नुसार अपात्रतेची कारवाई होवू शकते असे मार्गदर्शन सदस्यांना करून तशी इतिवृत्तांतामध्ये अपात्रते बाबत कारवाई संदर्भात नोंद घ्यावी.

१२.कागदपत्राची पुर्तता असुन देखील व नियमाप्रमाणे नोंद करणे आवश्यक असुन देखील ठरावास विरोध केल्यास अशा विरोध करणाऱ्या सदस्याचे नांव / नांवे इतिवृत्तांतामध्ये नोंदवून विरोधाचे कारण नमुद करावे. व नियमानुसार असतानाही नोंद न केल्यास त्याचे परिणाम / कारवाई मुद्दा क्रमांक ११ प्रमाणे होतील, याची नोंद इतिवृत्तांतामध्ये घ्यावी.

१३.ग्रामपंचायत मासिक सभेमध्ये मंजुरी देण्यात आल्यानंतरच सदर नोंद, फेरफार, फेरबदल नमुना नंबर 8 वर करण्यात यावी.

१४.नमुना नंबर 8 वर फेरफार केल्या नंतर नोंदी पुढील शेवटच्या रकान्यामध्ये सदर मासिक सभेचा ठराव क्रमांक व दिनांक नमुद करुन सरपंच यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित केल्या नंतरच सदर नोंदीचा नमुना नंबर 8 चा उतारा अर्जदार अथवा संबंधित व्यक्तींना देण्यात यावा.

१५.ग्रामपंचायतीकडे विहित नमुन्यात फेरफार नोंदवही ठेवण्यात यावी.सदरच्या नोंदवहीमधील नोंदीची तपासणी विस्तार अधिकारी (पंचयात) यांनी करावी व आवश्यक ते अभिप्राय देण्यात यावेत.

१६.ग्रामपंचायतीकडील नमुना नंबर 8 मध्ये फेरफार अथवा फेरबदल करणे संदर्भात उपरोक्त नमुद केले प्रमाणे कार्यवाही न केलेस व तसेच इकडील कार्यालयाच्या निर्दशनास आलेस संबंधित दोषी ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पंचायत) यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 मधील तरतुदी प्रमाणेशिस्तभंगविषयककारवाईकेलीजाईल.

१७.ग्रामपंचायतीच्या नमुना नंबर 8 मध्ये नोंद झाली हयाचा अर्थ तो मालकी हक्काचा पुरावा नव्हे ही बाब वेळोवेळी न्यायालयानी स्पष्ट केली आहे.सदर बाब सर्व संबंधिताच्या निर्दशनास आणावी.

ग्रामपंचायत नमूना नं.८ मध्ये मालकी हक्का संदर्भात फेर फार करताना खालीलप्रमाणे दस्तऐवज अर्जासोबत घेण्यात यावेत.

| अ.क्र. | फेरफार पध्दती | आवश्यक दस्तऐवज |
|---|---|---|
| १ | इमारत मालकाचा मृत्यू झाल्यास | १.इमारत मालकाचा मृत्यू दाखला.<br>२.अधिकृत वारस दाखला.<br>(गाव नमुना नं.६ क, मा. न्यायालयाकडील वारस दाखला , तहसिलदार यांचेकडील वारस दाखला.)<br>३.सहहिस्सेदाराचे हक्कसोड प्रमाणपत्र. |
| २ | इमारतीची खरेदी / विक्री झाल्यास तसेच बक्षिस पत्र / दान पत्र / मृत्यूपत्र सादर केल्यास | खरेदीखत प्रत./ बक्षिसपत्र प्रत/ दानपत्र प्रत/ मृत्यूपत्र प्रत. |
| ३ | मा. न्यायालयाच्या आदेशाने | सक्षम मा. न्यायालयाचा आदेश. |

वरीलप्रमाणे आवश्यक दस्तऐवज घेवून ग्रामपंचायतीच्या मान्यतेने फेरफार मंजूर करण्यात यावेत.

**प्रजित नायर (भा.प्र.से.)**
**मुख्यकार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सिंधदुर्ग**

प्रति,
गट विकास अधिकारी (पं स सर्व)
२/- सदरचे परिपत्रक आपल्या गटातील सर्व ग्रामपंचायतींच्या तात्काळ निदर्शनास आ

नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सील हॉलसमोर पुणे 1.
दूरध्वनी क्र.-020-26123826 फॅक्स क्र.- 020-26129949
ई-मेल आयडी क्र.do4.igrs@igrmaharashtra.nic.in

---

क्र.का.4/प्र.क्र.1488/16/नो.फी/466/16 दिनांक-31/3/2016

प्रति,

सर्व नोंदणी उपमहानिरिक्षक

विषय- महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे अनुच्छेद 34 मध्ये नव्याने दाखल परंतुकामध्ये नमूद केलेल्या दस्तांचे नोंदणीसाठी नोंदणी फी मधून सवलत देणेबाबत.

संदर्भ - आरजीएन-2016/51/सीआर-11/एम-1, दिनांक 31/3/16

महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) कायदा,2015 अन्वये दिनांक 24/4/2015 पासून जर निवासी किंवा कृषी मालमत्ता ही पती, पत्नी, मुलगा, मुलगी, नातू, नात, मरण पावलेल्या मुलाची पत्नी यांना बक्षीस देण्यात आली तर अशा दस्तास रु. रु.200/- इतके मुद्रांक शुल्क देय राहील अशी सुधारणा करणेत आली आहे.

याच धर्तीवर संदर्भित अधिसूचनेद्वारे वर नमूद प्रकारच्या बक्षीसपत्रांस रु.200/- इतकी नोंदणी फी विहीत करणेत आली आहे. ही सुधारणा दिनांक 1/4/2016 पासून अंमलात येणार असल्याने ती सर्व दुय्यम निबंधकांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. यासाठी या अधिसूचनेची प्रत सोबत जोडली आहे. ही अधिसूचना आपले अधिनस्त सर्व दुय्यम निबंधक यांचे आजच निदर्शनास आणून दयावी व त्याबाबतचा अहवाल आजच या कार्यालयाकडे सादर करावा.

नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणेकरिता..

का.प्र.मा.नो.म.नि.
यांचे सहीची अर्ज.

प्रत- 1) सर्व सह जिल्हा निबंधक यांना (संबंधित नोंदणी उपमहानिरिक्षक यांचेमार्फत)
2) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरिक्षक कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव.

Scanned by CamScanner

RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १, अंक १४(२)] शुक्रवार, एप्रिल २४, २०१५/वैशाख ४, शके १९३७ [पृष्ठे १६, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २५**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.—**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . | १–१६ |

दिनांक २२ एप्रिल २०१५ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एम. ए. सईद,**
प्रधान सचिव व विधि परामर्शी,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २४ एप्रिल २०१५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९५८ चा ६०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सहासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, २०१५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

१९५८ चा ६०. **२.** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे ) याच्या कलम २ मध्ये, विद्यमान खंड (अ) च्या अगोदर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम २ ची सुधारणा.

"(अअ) "अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई" याचा अर्थ, राज्य शासनाने, पदनिर्देशित केलेला असा अधिकारी किंवा असे अधिकारी, असा आहे आणि यात राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्याबाबतीत नेमून देता येईल अशा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो ;".

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ४ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) " विक्री, " या मजकुरानंतर, " भाडेपट्टा, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) दुसऱ्यांदा आलेल्या " विकास करार, " या मजकुरानंतर " भाडेपट्टा, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) समासटीपेमध्ये, " विक्री, " या मजकुरानंतर " भाडेपट्टा, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम १०ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (३अ) ई-प्रदानाद्वारे मुद्रांक शुल्क प्रदान करण्यासाठी, शासकीय जमा लेखांकन यंत्रणेच्या (आभासी कोषागार) वापराचे विनियमन करण्याची कार्यपद्धती ही, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी आदेशाद्वारे निर्धारित करील अशी असेल. ".

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० यामध्ये कलम १०ड समाविष्ट करणे.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०क नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

विवक्षित विभाग, संघटना, संस्था, इत्यादींनी मुद्रांक शुल्क प्रदानाची सुनिश्चिती करणे.

**" १०ड.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, राज्य शासनाचा कोणताही विभाग, स्थानिक स्वराज्यसंस्था, निमशासकीय संघटना, बँक व्यवसायी किंवा बँकेतर वित्तीय संस्था किंवा राज्य शासनाची मालकी, नियंत्रण असलेले किंवा राज्य शासनाकडून भरीव अर्थसहाय्य प्राप्त करणारा निकाय किंवा त्यांचा कोणताही वर्ग, त्यांच्या यंत्रणेमार्फत संमत होणाऱ्या किंवा त्यांच्या कार्यांशी संबंधित असलेल्या, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा, नोंदणी अनिवार्य नसलेल्या संलेखांच्याबाबतीत शासकीय जमा लेखांकन यंत्रणेमार्फत राज्य शासनाकडे यथोचित शुल्क भरले जाते याची सुनिश्चिती करतील, असे निदेश देता येतील.

(२) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, चलान विरुपित करण्यासाठी आणि अशा संलेखांवर पृष्ठांकन करण्यासाठी, पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या अशा विभागाने किंवा निकायाने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीला समुचित अधिकारी म्हणून प्राधिकृत करील.

(३) चलान विरुपित केल्यानंतर, संलेखांवर पुढील प्रमाणे पृष्ठांकन करणे हे, अशा प्रकारे प्राधिकृत केलेल्या समुचित प्राधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

" पावती/चलान क्रमांक ............... / जीआरएन क्रमांक ....... सीआयएन ............ दिनांक ............ अन्वये रुपये ....... एवढे मुद्रांक शुल्क हे, *रोखीने / दर्शनी धनाकर्षाद्वारे/प्रदानादेशाद्वारे/ईचलनाद्वारे भरण्यात आले.

कार्यालयाची मोहोर. अधिकाऱ्याची स्वाक्षरी.

*लागू नसेल ते खोडावे. ".

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३० मध्ये,— सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ३० ची सुधारणा.

(क) खंड (फ) मध्ये, " आणि " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) खंड (फ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (फ-अ) अनुसूची एक च्या अनुच्छेद ६३ मध्ये तरतूद केलेल्या कार्यकंत्राटाच्या संलेखांच्याबाबतीत, कंत्राट मिळणाऱ्या व्यक्तीला ; ".

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३१ च्या पोट-कलम (४) मधील परंतुकामध्ये, " दुपटीपेक्षा " या मजकुराऐवजी " चौपटीपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ३१ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३२अ मध्ये,— सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ३२अ ची सुधारणा.

(एक) पोट-कलम (१) मध्ये, " भाडेपट्याचे हस्तांतरणपत्र " या मजकुरानंतर, " आणि तसेच, मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या आधारे शुल्क आकारणीयोग्य असलेले, **अनुसूची एक** मध्ये नमूद केलेले इतर कोणतेही संलेख " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(दोन) पोट-कलम (२) मधील, तिसऱ्या परंतुकातील, " दुपटीपेक्षा " या मजकुराऐवजी " चौपटीपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(तीन) पोट-कलम (४) मधील,—

(क) पहिले व दुसरे परंतुक वगळण्यात येतील;

(ख) तिसऱ्या परंतुकातील, " दुपटीपेक्षा " या मजकुराऐवजी " चौपटीपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३२ब मध्ये,— सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ३२ब ची सुधारणा.

(एक) पोट-कलम (१) मध्ये, " लेखी अर्जाद्वारे अशा आदेशाविरुद्ध " या मजकुरानंतर " मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांत स्थित असलेल्या, संलेखाच्या विषयवस्तू असणाऱ्या मालमत्तांच्या बाबतीत अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई याच्याकडे आणि इतर भागांत स्थित असलेल्या मालमत्तांच्या बाबतीत " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) पोट-कलम (२) मध्ये, " उप नोंदणी महानिरीक्षक " या मजकुरापूर्वी " अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई किंवा " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४ च्या परंतुकामध्ये, खंड (अ) च्या उप-खंड (दोन) मधील परंतुकामध्ये, " दुपटीपेक्षा " या मजकुराऐवजी " चौपटीपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ३४ ची सुधारणा.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याचे कलम ३८ वगळणे.

**११.** मुख्य अधिनियमाचे कलम ३८ वगळण्यात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ३९ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३९ च्या पोट-कलम (१) मध्ये, उप-खंड (ब) च्या पहिल्या परंतुकामधील, " दुपटीपेक्षा " या मजकुराऐवजी " चौपटीपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ४० ची सुधारणा.

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४० मध्ये, " अशी खात्री पटली असेल तर, त्यास, " या मजकुरानंतर " मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यांतील क्षेत्रांच्या बाबतीत अपर मुद्रांक नियंत्रकाच्या आणि इतर क्षेत्रांच्या बाबतीत नोंदणी उप महानिरीक्षक व मुद्रांक उप नियंत्रकाच्या पूर्व मान्यतेने, " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ४८ ची सुधारणा.

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४८ मधील, पोट-कलम (१) मध्ये, परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु, **अनुसूची एक** च्या अनुच्छेद २५ अन्वये ज्यावर मुद्रांक शुल्क भरले आहे अशा स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या करारनाम्याची, नोंदणी अधिनियम, १९०८ च्या तरतुदींअन्वये नोंदणी केली असेल आणि त्यानंतर असा करारनामा हा, विक्री करारनाम्याच्या निष्पादनाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या आत, अशा करारनाम्याची विषयवस्तू असलेल्या मालमत्तेचा ताबा घेण्यापूर्वी कोणत्याही कारणास्तव नोंदणीकृत रद्दबातल विलेखाद्वारे रद्द केला असेल तेव्हा, रद्दबातल विलेखाच्या नोंदणीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत अनुतोषासाठी अर्ज करता येईल. ".

१९०८ चा १६.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ५२अ ची सुधारणा.

**१५.** मुख्य अधिनियमाच्या पोट-कलम ५२अ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील " एक लाख " या मजकुराऐवजी " पाच लाख " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) मधील " दहा लाख " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी त्या मजकुराऐवजी " वीस लाख " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० मध्ये कलम ६७अ समाविष्ट करणे.

**१६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६७ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

माहिती सादर करण्याचे आबंधन.

**" ६७अ.** (१) शुल्क आकारणीयोग्य असलेल्या संलेखाची निर्मिती, निष्पादन, देखभाल, नोंदणी, सत्यापन करण्यासाठी जबाबदार असलेली, राज्य शासनाकडून **राजपत्रात** अधिसूचित करण्यात येईल अशी कोणतीही व्यक्ती, संस्था, संघटना, कंपनी किंवा निकाय, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याने याबाबतीत विनिर्देशपूर्वक प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून सांगण्यात येईल तेव्हा, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडून विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या नमुन्यात आणि कालमर्यादेच्या आत माहिती सादर करतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये माहिती सादर करण्यासाठी जबाबदार असलेली अशी कोणतीही व्यक्ती, संस्था, संघटना, कंपनी किंवा निकाय यांनी विनिर्दिष्ट मुदतीच्या आत ती माहिती सादर करण्यात कसूर केल्यास, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेला इतर कोणताही अधिकारी, अशा कसूरदारास प्रत्येक

कसुरीबद्दल शास्ती म्हणून पाचशे रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतकी रक्कम भरण्याचा निदेश देईल. ”.

**१७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६८ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :— सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ६८ ची सुधारणा.

“ **६८.** जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, ज्यावरून कोणत्याही शुल्कासंबंधातील कोणतीही लबाडी किंवा अकृती उघड होईल, अशा कोणत्याही नोंदवह्या, पुस्तके, अभिलेख तसेच, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) च्या खंड (न) खाली नमूद केलेल्या डिस्केट, मॅग्नेटिक कार्ट्रिज टेप, सीडी-रॉम किंवा इतर कोणतेही संगणकीय वाचनीय साधन किंवा कोणताही इलेक्ट्रानिक अभिलेख, कागदपत्रे, दस्तऐवज, संलेख किंवा कार्यवृत्ते यांचे निरीक्षण करणे किंवा ते मागविणे आवश्यक आहे असे मानण्यास पुरेसे कारण असेल तेव्हा, त्यास, सर्व वाजवी वेळी, स्वतः किंवा गट-ब मधील राजपत्रित अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा किंवा नोंदणी अधिनियम, १९०८ अन्वये नियुक्त केलेला दुय्यम निबंधक, श्रेणी-एक याच्या दर्जापेक्षा किंवा मुद्रांक निरीक्षकाच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा नसेल असा, या बाबतीत त्याने आपल्या वतीने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यामार्फत कोणत्याही जागेत प्रवेश करता येईल आणि कोणत्याही व्यक्तीच्या, कार्यालयाच्या, व्यवसाय संस्थेच्या किंवा इतर कोणत्याही संस्थेच्या ताब्यातील त्या दस्तऐवजांचे निरीक्षण करता येईल आणि कोणतीही फी किंवा आकार न भरता, त्याला आवश्यक वाटतील अशा नोंदी व उतारे त्यावरून घेता येतील आणि कलम ३३ च्या तरतुदींनुसार आकारणीयोग्य असतील केवळ असेच दस्तऐवज जप्त करता येतील आणि ते अवरुद्ध करून ठेवता येतील. ”. तपासणी करण्याचे व माहिती मागविण्याचे अधिकार.

२००० चा २१.

१९०८ चा १६.

**१८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६८ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० यामध्ये कलम ६८अ समाविष्ट करणे.

“ **६८अ.** जर कोणतीही व्यक्ती कलम ६८ अन्वये प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या प्रवेशास प्रतिबंध करील किंवा त्यांची अडवणूक करील किंवा उचित सहाय्य करणार नाही तर, त्या व्यक्तीस, अपराध सिद्ध झाल्यावर, एका महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल. ”. अधिकाऱ्यांना प्रतिबंध करणे किंवा त्यांची अडवणूक करणे हा अपराध असणे.

**१९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७२ मध्ये,— सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ७२ ची सुधारणा.

(एक) खंड (अ) मध्ये, “ आणि ” हा शब्द वगळण्यात येईल;

(दोन) खंड (अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

“ (अअ) कलम ९ च्या खंड (ब) द्वारे त्याला प्रदान केलेले अधिकार, अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांच्याकडे किंवा इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे ; आणि ”.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याची अनुसूची एक ची सुधारणा.

**२०.** मुख्य अधिनियमाच्या **अनुसूची एक** मध्ये,—

(१) अनुच्छेद १ मध्ये,—

(क) खंड (१) च्या उप-खंड (ड) मधील, स्तंभ (२) मध्ये " शंभर रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून एक रुपया " या मजकुराऐवजी " अशा ऋणाच्या रकमेच्या किंवा मूल्याच्या ०.०१ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (२) मधील, स्तंभ (२) मध्ये, " रकमेपैकी दर शंभर रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया " या मजकुराऐवजी " रकमेच्या एक टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) अनुच्छेद २ ऐवजी, पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येईल :—

" २. **प्रशासन बंधपत्र—**

| | | |
|---|---|---|
| सरकारी बचत बँक अधिनियम, १८७३ याच्या कलम ६ अन्वये किंवा भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ अन्वये देण्यात आलेल्या बंधपत्रासह प्रशासन बंधपत्र. | पाचशे रुपये ; " ; | १८७३ चा ५. १९२५ चा ३९. |

(३) अनुच्छेद ३ मधील स्तंभ (२) मध्ये, " दोनशे रुपये " या मजकुराऐवजी " एक हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(४) अनुच्छेद ५ मध्ये,—

**(अ)** खंड (ग-ड) मध्ये—

**(एक)** उप-खंड (एक) मध्ये,—

(क) नोंद (अ) मधील स्तंभ (२) मध्ये, " अनुच्छेद ६० अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क " या मजकुराऐवजी, " अनुच्छेद ३६(चार) अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) नोंद (ब) मधील,—

(एक) उप-नोंद (१) च्या स्तंभ (२) मध्ये, " दोनशे रुपये " या मजकुराऐवजी, " दोनशे रुपये किंवा मोबदल्याच्या रकमेच्या ५ टक्यांएवढी रक्कम, यांपैकी जी अधिक असेल ती रक्कम " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप-नोंद (२) च्या स्तंभ (२) मध्ये, " अनुच्छेद ६० अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क " या मजकुराऐवजी, " अनुच्छेद ३६ (चार) अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क ", हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(दोन)** उप-खंड (दोन) मधील,—

(एक) नोंद **(अ)** मधील स्तंभ (२) मध्ये, " अनुच्छेद ६० अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क " या मजकुराऐवजी, " अनुच्छेद ३६(चार) अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क ", हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) नोंद **(ब)** मधील,—

(क) उप-नोंद (१) च्या स्तंभ (२) मध्ये, " शंभर रुपये " या मजकुराऐवजी " शंभर रुपये किंवा मोबदल्याच्या रकमेच्या ५ टक्यांएवढी रक्कम, यांपैकी जी अधिक असेल ती रक्कम " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) उप-नोंद (२) च्या स्तंभ (२) मध्ये, " अनुच्छेद ६० अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क " या मजकुराऐवजी " अनुच्छेद ३६ (चार) अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(तीन)** उप-खंड (तीन) मधील,—

(क) नोंद (अ) मधील स्तंभ (२) मध्ये, " अनुच्छेद ६० अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क " मजकुराऐवजी " अनुच्छेद ३६ (चार) अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) नोंद **(ब)** मधील,—

(एक) नोंद (१) च्या स्तंभ (२) मध्ये, " पन्नास रुपये " या मजकुराऐवजी, " पन्नास रुपये किंवा मोबदल्याच्या रकमेच्या ५ टक्क्यांएवढी रक्कम, यांपैकी जी अधिक असेल ती रक्कम " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) नोंद (२) च्या स्तंभ (२) मध्ये, " अनुच्छेद ६० अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क " या मजकुराऐवजी " अनुच्छेद ३६ (चार) अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(ख)** खंड (ह) मधील उप-खंड (अ) मध्ये,—

(एक) नोंद (एक) मधील,—

**(एक)** उप-नोंद (अ) च्या स्तंभ (२) मध्ये, " दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये पन्नास पैसे " या मजकुराऐवजी, " ०.२५ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(दोन)** उप-नोंद (ब) च्या स्तंभ (२) मध्ये, " दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता पाच रुपये " या मजकुराऐवजी, " ०.५ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) नोंद (दोन) मधील,—

**(एक)** उप-नोंद (अ) च्या स्तंभ (२) मध्ये, " दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये पन्नास पैसे " या मजकुराऐवजी " ०.२५ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(दोन)** उप-नोंद (ब) च्या स्तंभ (२) मध्ये, " दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता पाच रुपये " या मजकुराऐवजी " ०.५ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) नोंद (तीन) मधील,—

**(एक)** उप-नोंद (अ) मधील, स्तंभ (२) मध्ये, " दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये पन्नास पैसे " या मजकुराऐवजी, " ०.२५ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(दोन)** उप-नोंद (ब) मधील, स्तंभ (२) मध्ये, " दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता पाच रुपये " या मजकुराऐवजी, " ०.५ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(चार) नोंद (चार) मधील,—

**(एक)** उप-नोंद (अ) मधील, स्तंभ (२) मध्ये, " दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया " या मजकुराऐवजी, " ०.१ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(दोन)** उप-नोंद (ब) मधील, स्तंभ २ मध्ये, " दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये " या मजकुराऐवजी, " ०.२ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(पाच) नोंद (पाच) मध्ये,—

**(एक)** उप-नोंद (अ) मधील, स्तंभ (२) मध्ये, " दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये पन्नास पैसे " या मजकुराऐवजी, " ०.२५ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(दोन)** उप-नोंद (ब) मधील, स्तंभ (२) मध्ये, " दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता पाच रुपये " या मजकुराऐवजी, " ०.५ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(सहा) नोंद (सहा) मधील,—

**(एक)** उप-नोंद (अ) मधील, स्तंभ (२) मध्ये, " दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया " या मजकुराऐवजी, " रकमेच्या ०.१ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(दोन)** उप-नोंद (ब) मधील, स्तंभ (२) मध्ये, " दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये " या मजकुराऐवजी, " ०.२ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(५) अनुच्छेद ६ मधील,—

**(अ)** खंड (१) च्या,—

(एक) उप-खंड (अ) मधील, स्तंभ (२) मध्ये, " दर एक हजार रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया " या मजकुराऐवजी, " ०.१ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप-खंड (ब) मधील, स्तंभ (२) मध्ये, " दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये " या मजकुराऐवजी, " ०.२ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) खंड (२) मधील,—

(एक) उप-खंड (अ) मधील, स्तंभ (२) मध्ये, " दर एक हजार रुपयांकरिता किंवा त्यांच्या भागाकरिता एक रुपया " या मजकुराऐवजी, " ०.१ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप-खंड (ब) मधील, स्तंभ (२) मध्ये, " दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये " या मजकुराऐवजी, " ०.२ टक्के " हा मजकूर दाखल करण्यत येईल ;

(तीन) **स्पष्टीकरण एक** नंतर, पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल :–

" **स्पष्टीकरण दोन.—**या अनुच्छेदाच्या प्रयोजनार्थ, अतिरिक्त कर्जासाठी किंवा पूर्वीच्या कर्जामध्ये वाढ करण्यासाठी निष्पादित केलेला कोणताही नवीन संलेख हा, नवा संलेख असल्याचे समजण्यात येईल आणि त्यावर प्रतिभूत केल्या जाणाऱ्या किंवा वितरित केल्या जाणाऱ्या किंवा मंजूर केल्या जाणाऱ्या अतिरिक्त रकमेच्या मर्यादेपर्यंत शुल्क आकारणीयोग्य असेल. ";

(६) अनुच्छेद ७ मध्ये,—

(एक) खंड (अ) च्या स्तंभ (२) मध्ये, " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, " एक हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ब) च्या स्तंभ (२) मध्ये, " दोनशे पन्नास रुपये " या मजकुराऐवजी, " एक हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(७)** अनुच्छेद ८ मध्ये, स्तंभ (२) मधील, " शंभर रुपये एवढ्या कमाल मर्यादेस अधीन राहून (अनुच्छेद १३) बंधपत्रावरील, शुल्काएवढे शुल्क " या मजकुराऐवजी, " शंभर रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(८)** अनुच्छेद १० मध्ये, स्तंभ (२) मधील, " दर ५,००,००० रूपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक हजार रुपये " या मजकुराऐवजी, " भागभांडवलावर किंवा, यथास्थिति, वाढीव भागभांडवलावर ०.२ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(९)** खंड (१२) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :-

| | |
|---|---|
| " **१२. निवाडा.—** म्हणजे एखादा वाद चालू असताना न्यायालयाच्या आदेशाखेरीज अन्यथा निर्देश केल्यावर लवादाकडे विद्यमान किंवा भावी मतभेद दाखल करण्याविषयीच्या लेखी करारानुसार केलेला असेल असा, परंतु वाटणीचा निदेश देण्याबाबतचा निवाडा नसेल असा, लवादाने किंवा पंचाने दिलेला कोणताही लेखी निर्णय. | पाचशे रुपये. "; |

**(१०) अनुच्छेद** १३ मध्ये,—

(क) स्तंभ (१) मधील, " दर पाचशे रुपयांमागे किंवा त्याच्या भागामध्ये " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) स्तंभ (२) मधील, " शंभर रुपयांच्या किमान मर्यादेस अधीन राहून, पाच रुपये " या मजकुराऐवजी, " पाचशे रुपयांच्या किमान मर्यादेस अधीन राहून, बंधपत्राच्या रकमेच्या एक टक्का " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(११)** अनुच्छेद १४ मध्ये, स्तंभ (२) मधील, " तितक्याच रकमेकरिता बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क " या मजकुराऐवजी, " पाचशे रुपयांच्या किमान मर्यादेस अधीन राहून, बंधपत्राच्या रकमेच्या एक टक्का " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(१२)** अनुच्छेद १५ मध्ये, स्तंभ (२) मधील, " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(१३)** अनुच्छेद १७ मध्ये, स्तंभ (२) मधील, " दर एक हजार रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया " या मजकुराऐवजी, " ०.१ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(१४)** अनुच्छेद १८ मध्ये, स्तंभ (२) मधील, " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(१५)** अनुच्छेद २४ मध्ये, स्तंभ (२) मधील, " दोनशे रुपये " या मजकुराऐवजी, " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

**(१६)** अनुच्छेद २५ मध्ये, खंड (अ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

| | |
|---|---|
| " (अ) जंगम मालमत्तेच्या बाबतीत असेल तर, | मालमत्तेच्या बाजार मूल्याच्या ३ टक्के. "; |

**(१७)** अनुच्छेद २८ ऐवजी, पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येईल :—

| | |
|---|---|
| " **२८. सीमाशुल्क बंधपत्र किंवा उत्पादनशुल्क बंधपत्र.**-म्हणजेच, त्यावेळी अमंलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींस अनुसरून किंवा सीमाशुल्क अथवा उत्पादनशुल्क यांच्यापैकी कोणत्याही शुल्कासाठी किंवा त्यांच्यासंबंधात किंवा त्यातील लबाडीस किंवा टाळाटाळीस प्रतिबंध करण्यासाठी, किंवा त्यासंबंधीच्या कोणत्याही बाबींसाठी किंवा गोष्टींसाठी सीमाशुल्क किंवा उत्पादनशुल्क अधिकाऱ्यांच्या निदेशास अनुसरून दिलेले कोणतेही बंधपत्र. | पाचशे रुपये. "; |

**(१८)** अनुच्छेद ३४ मध्ये, स्तंभ (२) मधील, विद्यमान परंतुकानंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, जर निवासी आणि कृषि मालमत्ता ही पती, पत्नी, मुलगा, मुलगी, नातू, नात, मरण पावलेल्या मुलाची पत्नी यांना बक्षीस दिलेली असेल तर, आकारणीयोग्य शुल्काची रक्कम दोनशे रुपये इतकी असेल. ";

**(१९)** अनुच्छेद ३५ मध्ये, स्तंभ (२) मधील, " दोनशे रुपये " या मजकुराऐवजी, " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

**(२०)** अनुच्छेद ३९ मध्ये,—

(एक) खंड (अ) च्या स्तंभ (२) मधील, " दोनशे रुपये " या मजकुराऐवजी, " एक हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ब) च्या स्तंभ (२) मधील, " कंपनीच्या भागभांडवलानुसार " या मजकुराने सुरू होणाऱ्या व " बसविता येत असेल तितके शुल्क " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, " एक हजार रुपयांच्या किमान मर्यादेस व ५०,००,००० रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, कंपनीच्या भाग भांडवलानुसार ०.२ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

**(२१)** अनुच्छेद ४० मध्ये,—

(एक) खंड (ब) च्या स्तंभ (२) मध्ये, " अशा गहाणखताद्वारे " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " किंवा त्याच्या भागाकरिता पाच रुपये " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, " अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.५ टक्के, शंभर रुपयांच्या किमान मर्यादेस आणि दहा लाख रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (क) च्या स्तंभ (२) मध्ये, " दोनशे रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, प्रतिभूत केलेल्या रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क " मजकुराऐवजी, " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

**(२२)** अनुच्छेद ४५ मध्ये,–

(एक) खंड (अ) मधील,–

**(क)** स्तंभ (१) मध्ये, " प्रत्येक १,००० रुपये किंवा त्याच्या भागासाठी " हा मजकूर वगळण्यात येईल;

**(ख)** स्तंभ (२) मधील, " दहा रुपये " या मजकुराऐवजी, " आदेशान्वये, प्रदान रकमेच्या एक टक्का " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) खंड (ब) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

| | |
|---|---|
| (ब) दिनांकोत्तर किंवा दर्शनोत्तर एका वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत प्रदेय असेल त्याबाबतीत. | आदेशान्वये प्रदान करावयाच्या रकमेच्या दोन टक्के. "; |

**(२३)** अनुच्छेद ४६ मध्ये, स्तंभ (२) मधील, " प्रत्येक पाचशे रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दहा रुपये " या मजकुराऐवजी, " दोन टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

**(२४)** अनुच्छेद ४७ ऐवजी, पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येईल :—

**" ४७. भागीदारी—**

(१) नफा मिळविण्यासाठी व नफ्याच्या हिश्श्यासाठी- मग तो रोख रकमेच्या स्वरुपात असो किंवा वस्तूच्या स्वरुपात असो- एखादा व्यवसाय चालविणारी मर्यादित दायित्व असलेली भागीदारी व संयुक्त उपक्रम यांच्यासह कोणत्याही भागीदारीचा संलेख–

| | |
|---|---|
| (अ) भागीदारीमध्ये अंशदानाचा हिस्सा नसेल किंवा रोख रकमेच्या स्वरुपात आणलेल्या अशा अंशदानाचा हिस्सा ५०,००० रुपयांहून अधिक नसेल त्याबाबतीत, | पाचशे रुपये. |

| | |
|---|---|
| (ब) रोख रकमेच्या स्वरूपात आणलेल्या अशा अंशदानाचा हिस्सा ५०,००० रुपयांहून अधिक असेल त्याबाबतीत, | अंशदानाच्या रकमेच्या एक टक्का पंधरा हजार रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून. |
| (क) असा अंशदानाचा हिस्सा, रोख रक्कम वगळता, मालमत्तेच्या स्वरुपात आणलेला असेल त्या बाबतीत. | अशा मालमत्तेच्या बाजारमूल्यावर अनुच्छेद २५ च्या खंड (अ), (ब) किंवा यथास्थिति, खंड (ग) अन्वये अभिहस्तांतरण पत्राच्या बाबतीत बसविण्यायोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क. |
| (२) भागीदारीचे विसर्जन, किंवा भागीदाराची निवृत्ती मर्यादित दायित्वाच्या भागीदारीचा समावेश आणि धंदा चालविण्यासाठी, नफा कमविण्यासाठी आणि नफा वाटून घेण्यासाठी– मग तो रोख रकमेच्या स्वरुपात असो किंवा वस्तूच्या स्वरूपात असो-संयुक्त उपक्रम– | |
| (अ) जेव्हा कोणतीही मालमत्ता, ज्या भागीदाराने आपल्या वाट्याचे अंशदान म्हणून ती भागीदारीत आणली त्याहून अन्य भागीदाराने भागीदारीचे विसर्जन झाले असता किंवा एखादा भागीदार निवृत्त झाल्यावर आपला हिस्सा म्हणून ताब्यात घेतली असेल तेव्हा. | किमान शंभर रुपयाच्या अधीनतेने, अशा मालमत्तेच्या बाजारमूल्यावर अनुच्छेद २५ च्या यथास्थिति, खंड (अ), (ब) किंवा (क) अन्वये अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसविण्यायोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क. |
| (ब) इतर कोणत्याही बाबतीत, | पाचशे रुपये. ”; |

**(२५)** अनुच्छेद ४८ मधील,-(एक) खंड (अ) मधील, स्तंभ (२) मध्ये, “ शंभर रुपये ” या मजकुराऐवजी, “ पाचशे रुपये ” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) खंड (ब) मधील स्तंभ (२) मध्ये, “ शंभर रुपये ” या मजकुराऐवजी, “ पाचशे रुपये ” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(तीन) खंड (क) मधील, स्तंभ (२) मध्ये, “ शंभर रुपये ” या मजकुराऐवजी, “ पाचशे रुपये ” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(चार) खंड (ड) मधील, स्तंभ (२) मध्ये, “ शंभर रुपये ” या मजकुराऐवजी, “ पाचशे रुपये ” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(पाच) खंड (इ) मधील, स्तंभ (२) मध्ये, “ शंभर रुपये ” या मजकुराऐवजी, “ पाचशे रुपये ” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(सहा) खंड (फ) मधील, उप-खंड (दोन) च्या परिच्छेद (अ) मध्ये, " नातू, नात किंवा असे इतर जवळचे नातेवाईक " या मजकुराऐवजी " मुलगा, नातू, नात किंवा विवाहसाथीचे वडील, आई, भाऊ किंवा बहीण " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(सात) खंड (ह) मधील, स्तंभ (२) मध्ये, " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

**(२६)** अनुच्छेद ५१ ऐवजी, पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येईल :—

**" ५१. गहाण मालमत्तेचे प्रत्यंतरणपत्र.** पाचशे रुपये. ",

**(२७)** अनुच्छेद ५२ मधील, स्तंभ (१) च्या खंड (अ) मध्ये, " वरीलपैकी नातेसंबंध असणाऱ्या व्यक्तीचे कायदेशीर वारस यांनी किंवा त्यांच्यावतीने " या मजकुरानंतर, " कोणत्याही स्वरूपातील मोबदल्याशिवाय " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

**(२८)** अनुच्छेद ५३ मधील, स्तंभ (२) मध्ये, " प्रतिभूत केलेल्या कर्जाच्या रकमेच्या बंधनपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क " या मजकुराऐवजी, " किमान पाचशे रुपयांच्या अधीनतेने, प्रतिभूत केलेल्या कर्जाच्या रकमेच्या एक टक्का " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

**(२९)** अनुच्छेद ५४ ऐवजी, पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येईल :—

| | |
|---|---|
| **५४. प्रतिभूति-बंधपत्र किंवा गहाणखत.**—एखाद्या पदाचे उचित कार्यपालन करण्याकरिता प्रतिभूती म्हणून किंवा त्या पदाच्या नात्याने मिळालेला पैसा किंवा इतर मालमत्ता यांचा हिशेब देण्याकरिता निष्पादित केलेले किंवा एखाद्या कराराच्या रीतसर पालनाची हमी म्हणून एखाद्या जामीनदाराने निष्पादित करून दिलेले किंवा न्यायालयाच्या किंवा सरकारी अधिकाऱ्याच्या आदेशास अनुलक्षून निष्पादित करून दिलेले, परंतु, महाराष्ट्र न्यायालय-शुल्क अधिनियमाद्वारे अन्यथा तरतूद न केलेले. | विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.५ टक्के मात्र दहा लाख रुपयांच्या कमालमर्यादेस अधीन राहून :<br>परंतु, जिच्यासाठी एखादी व्यक्ती जामीन राहिली आहे किंवा तिने प्रतिभूती बंधपत्र किंवा गहाणखत करून दिलेले आहे अशा एखाद्या व्यक्तीकडून करण्यात आलेल्या एखाद्या संलेखावर अनुच्छेद ४० अन्वये शुल्क भरले असेल त्याबाबतीत, शंभर रुपये एवढे शुल्क देय असेल. "; |

**सूट**

बंधपत्र किंवा अन्य संलेख जेव्हा,—

(अ) धर्मार्थ दवाखाना किंवा रुग्णालय किंवा सार्वजनिक उपयुक्ततेचे इतर कोणतेही उद्दिष्ट यांसाठी देण्यात येणाऱ्या खाजगी अंशदानातून होणारे स्थानिक उत्पन्न, दरमहा विनिर्दिष्ट रकमेपेक्षा कमी होणार नाही अशी हमी देण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही व्यक्तीने;

(ब) महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ याच्या कलम ११४ अन्वये राज्य शासनाने केलेल्या नियमांनुसार; १९७६ चा महा. ३८.

(क) जमीन सुधारणा कर्ज अधिनियम, १८८३ किंवा शेतकरी कर्ज अधिनियम, १८८४ याअन्वये कर्जाऊ रकमा घेणाऱ्या व्यक्तींनी किंवा त्यांच्या जामिनदारांनी अशा कर्जाऊ रकमांच्या परतफेडीबद्दलची प्रतिभूती म्हणून; १८८३ चा १९. १८८४ चा १२.

(ड) एखाद्या पदाचे कार्य रीतसर पार पाडण्याबद्दल किंवा त्या पदाच्या नात्याने मिळालेला पैसा किंवा इतर मालमत्ता यांचा योग्य हिशेब देण्याबद्दल प्रतिभूति म्हणून शासकीय अधिकाऱ्यांनी किंवा त्यांच्या जामीनदारांनी ;

निष्पादित करून दिलेला असेल तेव्हा.

**(३०)** अनुच्छेद ५५ मधील,—

(एक) खंड **(अ)** मध्ये, उप-खंड (एक) च्या स्तंभ (२) मधील, " प्रत्येक पाचशे रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दहा रुपये " या मजकुराऐवजी " दोन टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड **(ब)** मधील,—

(क) उप-खंड (एक) च्या स्तंभ (२) मधील, " स्वंव्यवस्था रद्द करण्याबद्दलच्या संलेखात " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " दोनशे रुपयांहून अधिक असणार नाही " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) उप-खंड (दोन) च्या स्तंभ (२) मधील " संव्यवस्था रद्द करण्याबद्दलच्या संलेखात " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " दोनशे रुपयांहून अधिक असणार नाही " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**(३१)** अनुच्छेद ५९ मध्ये,—

(एक) खंड (अ) मधील, स्तंभ (२) मध्ये, " प्रत्येक १०० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता पन्नास पैसे " या मजकुराऐवजी " ०.५ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(दोन) खंड (ब), (क) आणि (ड) मधील, स्तंभ (२) मध्ये, " हस्तांतरणात नमूद केल्याप्रमाणे हितसंबंधाच्या रकमेइतक्या " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " दोनशे रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

**(३२)** अनुच्छेद ६० मधील, स्तंभ (२) मध्ये, " हस्तांतरणाची विषयवस्तू असणाऱ्या मालमत्तेच्या " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " शुल्काइतके शुल्क " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" भाडेपट्टयाच्या उर्वरित कालावधीकरिता अनुच्छेद ३६ च्या खंड (एक), (दोन), (तीन) किंवा (चार) अन्वये, यथास्थिति, भाडेपट्ट्यावर बसविण्यायोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क ";

**(३३)** अनुच्छेद ६१ मध्ये,—

(एक) नोंद **(अ)** मध्ये,—

(एक) उप-नोंद (अ) मधील, उप-खंड (एक) च्या स्तंभ (२) मध्ये, " प्रत्येक पाचशे रुपयांकरिता किंवा त्यांच्या भागाकरिता दहा रुपये " या मजकुराऐवजी " दोन टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(दोन) उप-नोंद (ब) मध्ये,—

(क) उप-खंड (एक) मधील, स्तंभ (२) मध्ये, " संव्यवस्था केलेल्या रकमेइतक्या " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " दोनशे रुपयांपेक्षा अधिक असणार नाही " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (दोन) मधील, स्तंभ (२) मध्ये, " संव्यवस्था केलेल्या रकमेइतक्या " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " दोनशे रुपयांपेक्षा अधिक असणार नाही " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) नोंद **(ब)** मधील, स्तंभ (२) मध्ये, " संव्यवस्था केलेल्या रकमेइतक्या " या मजकुराने सुरु होणाऱ्या आणि " दोनशे रुपये " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**(३४)** अनुच्छेद ६३ मध्ये,—

(एक) खंड (अ) मधील, स्तंभ (२) मध्ये, " शंभर रुपये " या मजकुराऐवजी " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(दोन) खंड (ब) मधील, स्तंभ (२) मध्ये, " पाच लाख रुपयांच्या " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " भागाकरिता १०० रुपये " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, " पंचवीस लाख रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, पाचशे रुपये अधिक दहा लाख रुपयांवरील रकमेच्या ०.१ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्था व प्राधिकरणाच्या क्षेत्रातील स्थावर मालमत्तांवर कर निर्धारण...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: एसटीपी-2189/प्र.क्र.673/भाग-2/म-1,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 2 डिसेंबर 1989.

**शासन निर्णय:-**

स्थानिक स्वराज्य संस्था व प्राधिकरण यांच्या अधिकार क्षेत्रातील मालमत्तांवर कर आकारणी करण्यासाठी मालमत्ताचे पट्टी योग्य मूल्य (रेटेबल व्हॅल्यू) निधारित करून त्यानुसार कर निर्धारण करतात व अशी कर निर्धारणा ठराविक कालावधीनंतर सुधारतात. नविन तयार झालेल्या इमारतींचे कर निर्धारणापूर्वी प्रथम पहाणी करण्यात येते. त्यावेळी त्या वास्तुचा उपयोग कशासाठी केला जात आहे. तेथे कोण रहात आहेत वा वापर करत आहे आणि वापर करणा कोणत्या अधिकाराने वापर करत आहे यांची नोंद घेतली जाते. जमीन मालक व वापर करणारा वेगवेगळे असतील, तर त्यांच्यातील कायदेशीर संबंध तपासून त्याप्रमाणे नोंदणी करणेही आवश्यक असते.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण होत असताना केवळ मोबदल्याची रक्कम देवून दस्ताची नोंदणी न करता साध्या पावतीने, चिठ्ठीने वा पंचनाम्याने हस्तांतरण केले जाते. भारतीय नोंदणी अधिनियम 1908 च्या कलम 17 मधील तरतुदीप्रमाणे स्थावर मालमत्तेची किंमत रुपये 100 वा जास्त असल्यास दस्तऐवजाची नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी न केलेले दस्त हस्तांतरणाचा ग्राह्य पुरावा होवू शकत नाहीत. तथापि, पट्टी योग्य मूल्य व कर निर्धारणेच्या वेळी काही महानगरपालिका, नगरपालिका वा ग्रामपंचायत हस्तांतरणाचा पुरावा म्हणून न नोंदलेले दस्तऐवज देखील ग्राह्य पुरावा धरतात आणि कर आकारणी अवैध हस्तांतरीत व्यक्तीच्या नावे करतात जे योग्य नाही.

वरील बाबींचा विचार करून शासन असे आदेश देत आहे, की जर निर्धारण करताना जमिनीच्या मान्य मालकाशिवाय अथवा इमारतीच्या वैध हस्तांतरणाने झालेल्या मालकाशिवाय इतर कोणीही व्यक्ती इमारतीच्या वा इमारतीच्या भागाच्या वा सदनिकेच्या मालकीबाबत आग्रह धरत असेल तर हस्तांतरणाच्या नोंदलेल्या दस्ताची मागणी कर निर्धारण अधिका-यांनी करावी. आणि नोंद केलेल्या दस्ताने झालेले, हस्तांतरण वैध व ग्राह्य हस्तांतरण समजावे. नोंद न केलेले खरेदीचे हस्तांतरण ग्राह्य मानू नये व हस्तांतरीत व्यक्तीच्या नावे कर निर्धारण न करता उपलब्ध अभिलेखात ज्याचे नाव आहे त्याच्या नावाने कर निर्धारण करावे. ही वस्तुस्थिती सर्व संबंधितांच्या नजरेस आणून त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

ओ.पी. गहरोत्रा
सचिव
महसूल व वन विभाग.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
जमाबंदी आयुक्त संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,

सर्व महानगरपालिका आयुक्त,

सर्व नगरपालिका,

महानगर आयुक्त, मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई,

प्रशासक महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास अधिकरण, मुंबई,

संचालक नगररचना व मुल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे,

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे,

विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, मुंबई/अंमलबजावणी मुंबई/नागपूर, नाशिक, औरंगाबाद, ठाणे,

सर्व जिल्हाधिकारी,

सर्व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी,

नगरविकास विभाग,

ग्राम विकास विभाग,

वित्त विभाग,

निवड नस्ती म–1 कार्यासन, महसूल व वन विभाग.

---